म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५४०
१८२५

REFBK-0002836
REFBK-0002836

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. नं. ५४६०

शिव पेठेतील

प्रसन्न

## जुना मावळी मेळा.

# पद्यावली.



सन १९२५.

REFBK-0002836

किंमत एक आणा.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे दा. क. २८३५

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# जुना मावळी मेळा

## पद १ लें.

आरंभ श्रीमन्महागणाधिश मंगल जयजयकार ॥ ध्रु० ॥

अष्टौसिद्धी दासी जयाच्या तत्पर सेवेला । सती शारदा वरी प्रमोदें मंगलमूर्तीला ॥ १ ॥ विनायकाच्या नामःस्मरणी पावन करूं वाणी । विघ्ननिवारक मंगलकारक नित्य जया स्मरणी ॥ २ ॥ भारतभूवर स्वातंत्र्याचा उदय झणीं होवो । परवशतेची तुटो शृंखला गुलामगिरी जावो ॥ ३ ॥ अज्ञ बालकें तुझींच आम्ही संभाळुनी घेई । धांव [illegible] ॥ हीच विनंती स्वतंत्रता देई ॥ ४ ॥

---

## पद २ रें.

ळाजी पाटील सांगतो वर्षाची मात । देशामधले हिरे हरपले जनां होत ॥ ध्रु० ॥ देशबंधु ते दास सोडुनी गेले परलोकीं । कारें हिंद माउली रडते अजुनी कीं ॥ ग्वाल्हेरीचा प्रताप-

शाली माधवजी शिंदा । प्रजारंजना चंग बांधला रयतेचा बंदा ॥ कर्तबगारी थोर तयाची लौकिक दुनियेंत । परदेशीं तो जातां त्याला काळ गांठि तेथ ॥ वृद्ध अनुभवी वंगपुढारी बानरजी गेला । राष्ट्राचा उल्हास अशानें बहु कमती झाला ॥ देशाचे थोरले गव्हर्नर जाउनियां बसले । विलायतेमधिं खलबत करिती चतुर तेहि असले ॥ १ ॥ मुंबइमधले गिरणीवाले एकमतें करती । पोट मारिती मजुरांचें ते अजुनी ओरडती ॥ बेकारी वाढली मिळेना धंद्या कोणाला । शिकलेले हिंडती रिकामे चिंता सर्वांला ॥ टॅक्स वाढले लोकलबोर्डें शिकाच म्हणतात । परी पोट हें भरण्याची कुणि बोलेना बात ॥ कौन्सिलवाले लेक्चर देती त्या कुणि मानीना महाराज गांधीही दमले चरखा चालेना ॥ एकमेक काढूनि कुरापत भांडण बहू करिती । वाचाळांची जिकडे तिकडे पहा दिसे भरती ॥ २ ॥ फॅशन शिरली घरोघरीं ही नांगर फिरवील । दिडकीला जन महाग झाला, तरीहि मिरवील ॥ देशबंधुनो उठा, रिकाम्या वाता सोडून । परके पहाती मौजा अमुच्या, हसतीं आडून ॥ मारा मत्सर, आळस टाका, उन्नतिला साधा । नाहींतर फेऱ्यांत भोगणें काळाची बाधा ॥ तुरुंगवासी बापट झाले, ओस पडे मुळशी । टाटा आतां खणून काढिल सोन्याची कळशी ॥ इतकें झालें तरिही अमुचें भांडण संपेना । फुटती डोकीं, देश ध जाइल समजाना ॥ ३ ॥

---

## पद ३ रे.

हा कर्मयोगी अवतार लोकमान्यांचा ॥ ध्रु ॥ आज भ परिमल सुटला, रहस्य गीतेचा ॥ १ ॥ त्रिभुवनी साऱ्या गर्जत

काव्य ८०६

डंका कीर्तीचा ॥ २ ॥ सुपुत्र प्यारा, राजस चिमणा, भारत-भूमीचा ॥ ३ ॥ रत्नगिरीला हिरा गवसला, अमोलिक साचा ॥ ४ ॥ स्वराज्यतारू वल्हविणारा, नावाडी आमुचा ॥ ५ ॥ घटासी व्हा घट, बोध शिकविला, समर्थ दासांचा ॥ ६ ॥ आत्मत्वाचा, स्वयं-स्फूर्तिचा, गड्डा बुद्धीचा ॥ ७ ॥ कवीरामाचा, थाट शाहिरी स्वराज्य स्फूर्तीचा ॥ ८ ॥

---

## पद ४ थें.

गरीबी येत देशाला । तरी ना दाद कोणाला ॥ ध्रु० ॥ मिळेना अन्न खायाला । तरी ना दाद कोणाला ॥ मुलांच्या शिक्षणासाठीं । चालला खर्च किति कोटी ॥ उपाशी राहुनी पोटीं । खर्चिती शिक्षणासाठीं ॥ कर्जही काढुनी हातीं । हे मनीऑर्डरी देती ॥ विचाऱ्या आईबापाला । वाटतें पोर जर शिकला ॥ नसे मग अंत सौख्याला । मिळवितां अमित द्रव्याला ॥ मुलांच्या कालरी शर्ट । विजारी बूटही हॅट ॥ सिनेमा नाटकें होती । अपेशा शेवटीं घेती ॥ परीक्षा होय नापास । पित्याच्या ये गळां फास ॥ जाहला पास जर बाळ्या । तरीही नौकऱ्या कुठल्या ॥ हिंडती अर्ज घेऊन। वशीले अमित लावून । तरी ही 'नो' म्हणे 'सॉरी' । परतली खिन्नशी स्वारी ॥ शिरीं हें कर्ज मनिं चिंता । किती हे हाल हो पहातां ॥ इंग्रजी फसवितो भपका । शेवटीं आणितो ठपका ॥ पुरे हे चोचले आतां । नको या इंग्रजी बाता ॥ जुने उद्योग बुडतात । नव्यानें कोरडा हात ॥ चला जा शेतकी साधा। चला जा झोपडी बांधा ॥ सुखाची खेडवळ वस्ती । नको ही बेगडी मस्ती ॥ मनाला शांतता

वाटे । शरीरा पुष्टता येते ।। करावी आपुली शेती । कशाला कष्ट मग होती ।।

---

## पद ५ वें.

तुमची झोंप कधीं सरणार ।। हो ।। शांत किती राहणार ।। ध्रु ।। शांतियुगाच्या विश्वकल्पना जसे मनोरे हवेंतील । वरकांती शांतिचा डोलारा अंतीं दगा देणार ।। १ ।। ज्यावेळेला सूर्य पूर्वेचा पश्चिमेला उगवेल । त्या वेळेला हिंदुमुसलमिन शक्य एकी होणार ।। २ ।। निर्बल पंगू झाला म्हणूनी शांतीपवाडे गावूं नका । बलवानाची सहनशीलता तीच श्रेष्ठ ठरणार ।। ३ ।। बलवान जिवानें निर्बल जीवा खुशाल खाऊन टाकावे । मार्जारानें मूषक गिळितां पाप काय म्हणणार ।। ४ ।। निसर्गानिर्मित कडक कायदे दया न तेथें कोणाला । जो लाथाडिल निसर्गानियमा शासन त्या मिळणार ।। ५ ।। ह्या तत्वाला धरून सारी सृष्टीरचना झाली असे । गुणकर्मविभागाणि पालन करीजो मोक्षाला जाणार ।। ६ ।। करावयाचें करोनि जावें राजकारणांतिल नियम । आधी वाच्यता केल्यावर मग शत्रू कसा जिंकणार ।। ७ ।।

---

## पद ६ वें. ( संवाद )

मुलगा—मला मुंबईला जायचं तिकिट काढुन कां हो द्या ना ।। आगिन्‌गाड्या किती, टामूरेळी चालती, मोटार फों फों करी हिंडते ना ? ।।

बाप—गाडीखालीं पडशिल, धक्के किती खाशिल; कष्ट जिवाला होतिल नाना ॥

मुलगा—गिरणिमंदी जानार, रोजगारी होनार, मंग ऐटींत मिरवीन मी ना ! ॥

बाप— कामाखालीं मरन, भाकरी संग वरन, तुला तेही मिळल कां रे अण्णा ॥

दारु पिशिल गडया, घेशिल नामी उडया, होतिल फजीतिचे थेर नाना ॥

मुलगा—चाळीमंदि राहिन, फिरायाला जाइन, मग गांट्रोड मौजा बी पहा ना ॥

बाप—कुचंबना जिवा, तिथें नसे हवा, फुकट मरशाल जाऊन नाना ॥

वस्ती आपली बरी इथं खेडयांत शेतीच करना ॥ १ ॥

---

## पद ७ वे.

अहो राणोजी–रावहो तुम्ही दरबारचे ल्वाक । आम्हासी सांगा कांहीं तिकुडली खबर बात एक ॥ ध्रु ॥ कायराव सांगू तुम्हास्नी आतां कपाळ आपलं फुटलं । पिसाळ सूर्याजीनं सार वाटोळ संमद्याचं क्याल ॥ १ ॥ लाच खाऊनी फितूर झाला झुल्फिकिरखानाला । आपल्या हातानं च्वार दरवाजा त्यानं खुला केला ॥ २ ॥ अहो लाविला ह्यानं काळिमा मऱ्हाठ नांवाला । कुऱ्हाडीचा

दांडा गोताला काळ पिसाळ झाला ॥ ३ ॥ राजलक्ष्मी येसूबाईला तस बाळ–राज । नेल मोंगलानी कैद करोनीं काय राखली लाज ॥ ४ ॥ थोरल्या महाराजाना कायरं सर्गात वाटल । ह्याची नाहिं कारं शरम कुणाला, फितूरीनं घेरलं ॥ ५ ॥ ही फितूरीची कीड लागली मऱ्हाठ शाहीला । नव्हर बरं तिच्याच पायीं मुकाल राज्याला ॥ ६ ॥ आपल्या संभाजी महाराजाना गफलतीनं घरलं । तुळशी रांडचं शिरक्या गणूचं कारस्थान भवलं ॥ ७ ॥ तापलेल्या सांडसानं तर आधी डवाळ चिरलं । काय सांगू मी महारांचें किती हाल झालं ॥ ८ ॥ तरी सिंव्हाचा अस्सल छावा नाहीं डगमगला । ‘ काळ तुलाही बसला खायाला ’ बोले अलमगिराला ॥ ९ ॥ महाराजानी समद्या परजेला निरोप पाठवला ‘ आम्ही जातो राज्य संभाळा हाकलुन मोगलाला ’ ॥ १० ॥

---

## पद ८ वे.

सुनो सहकारके बन्दे । प्रतिज्ञा मावला ओंकी । चियेंगे क्षात्रवृतिसे । बजानेको विजय डंका ॥१॥ यदि स्वातंत्रलक्ष्मीको जिगरसे चाहते हम तो । धर्येंगे जोरसे आगे । बजाने को विजय डंका ॥२॥ कपट छल भेदनीतिका । अधम अवलंबको तजके । अहिंसा सत्यसे जगमें । बजानेको विजय डंका ॥ ३ ॥ जनुनी जन्मभूमिकी कटें परदास्यकी बेडी । शिवाजीके मराठे हम बजानेको विजय डंका ॥४॥

---

## पद ९ वें.

तुम्ही मराठे शिवरायाचे चरित्र अठवावे । महाराष्ट्र केसरी छावे

कधीं न विसरावे ॥ ध्रु ॥ श्रद्धा ठेवा मी पण जगवा त्यजा दुही हेवा स्वराज्य तरूचे कोंब वाढवा वृक्ष पुढें व्हावा शिवरायानें पूर्ण जाणुनी स्वतंत्रता मर्म । सह्याद्रीवर नवा स्थापिला महाराष्ट्र धर्म । चाल रणशूर मराठे गडी । फौजही खडी । मराठे गडी । शिवराय बोध ऐकावा । महाराष्ट्र धर्म स्थापावा । कारणे देह ठेवावा । साफल्य जन्महा शिवरायाचे सवंगडी व्हावे ॥१॥ शेती करोनी पोट भरावे ठाऊक हे ज्याना । स्वातंत्र्याचे दिले बाळकडु शिववानें त्यांना । शिवरायावर पूर्ण भरंवसा असे मावळ्यांचा । इमानि बाणा स्वदेश प्रेमा अलौकिक त्यांचा । ( चाल ) भक्तिची खरी कसोटी । कार्य ती करी । साह्य श्रीहरी । मग काय उणें देशाला । जो ब्राह्मण पालन वाला । शककर्ता राजा झाला । शिवराय कृतीचें— पावनदायक सुधापान प्यावे ॥ २ ॥

---

## पद १० वें.

कशी राव झाली स्थिती आपुली धडगत नाहीं दिसत । नाहीं कुणाचा पायपोसही कुणाच्याच पायांत ॥ ध्रु० ॥ संमद्या ठिकाणीं भांडण तंटे । विकोपास जाती आपापसामधि एकमेकाची टाळकिरं फोडिती ॥ १ ॥ लोकमान्यांनीं गणपतीउत्सव कशापायीं काढला । आपुण कोणहो व्हतो पूर्वीच ह्येच तर शिकण्याला ॥ २ ॥ त्यें टाकलं बाजूला शिकणं संमदं बोकळलं तंटं । त्याचा फायदा तुमच्या खव्याची तिसरा लावतो वाटं । चहूंकडूनरं आधींच आपुन झालो कंगाल ॥ ३ ॥ फेशननं तर पुरं गांठलं सर्व लुटून नेलं ॥ ४ ॥ अवर्षणानं शेतांचं तर नांव नाहीं उरलं । पोटासाठीं बनले शेतकरी

मजूर गिरणींतलं ॥ ५ ॥ सरकारपट्टी भरण्यापायीं इकती गुरंढारं । समदं पळत्याती बंबई पुण्याला सोडून घरदार ॥ ६ ॥

---

## पद ११ वे.

कर्मवीरा जन्म देते । सद्धर्माची तूंचि माउली धन्यधन्य तूं भारतमाते ॥ ध्रु० ॥ भगवंताची वदली वाणी । धक्का न लावी सत्याचरणी । कर्मभूमिही सार्थ पदाते ॥ १ ॥ ज्या ज्या वेळीं धर्म सनातन । पाखंडिमतानें गेला लोपुन । त्या वेळीं जग जागे करिते ॥२॥ पावनदायक गंगासरिता । कधी वाण ना तपस्विसन्ता । भूषणहिमनग निवासशान्तें ॥ ३ ॥ माहेरघर हें वेदांताचे । आतमत्वाच्या आदर्शाचें । जो जे पाहिल तें त्या दिसते ॥ ४ ॥ भीष्मासमजो वचनाचे धड । नव्हते त्याना कांहींच अवघड । परि सत्यपालना सोडि तनुते ॥ ५ ॥ भगवंताच्या कृपा प्रसादें । भारतभूचे दैन्य जाऊं दे । स्वातंत्र्यता दे भारतभूते ॥ ६ ॥

---

## पद १२.

बडे बापके बेटे कथलाचा वाळा सोनुताईला ॥ध्रु०॥ जमीनदार सावकार । त्यांनीं खाल्लं घरदार । आज बनले नादार । गरिबांचा तळतळाट घेतला ॥ १ ॥ त्यांचे सरकतवाले । देशोधडी लागले । आपण गबर झाले । मोटारमधें पैसा गुंतवीला ॥ २ ॥ गरिबांना पिळून । पैसा गोळा करून । परक्या देशामधून । माल घेऊन गोरा सधन केला ॥ ३ ॥ निमकहराम झाले । शपथ विसरुन गेले । काळघोटे बनले । विसरुन गेले पांडुरंगाला ॥ ४ ॥

ग्रं-काव्य ८०६



## पद १३ वे.

फोड फोड मग झोड। भारता पहा एकच आहे तोड। भारता० ॥ धृ ॥ जो जसा तुला भेटेल। वागेल जसा बोलेल। तूं उलट तसा दे सवाल। भारता ॥ १ ॥ आजना पूर्वींची दुनिया। हे हवे काय शिकवाया। पाहिजे सहज समजाया ॥ २ ॥ ज्या गोष्टी सत्य-युगांत। कलियुगांत द्वापारांत। कलियुगीं फोल त्या ठरत ॥ ३ ॥ काळानुरुप वागावे। आपुले मार्ग बदलावे। परि ध्येय कधीं न सोडावें ॥ ४ ॥ येतील झुकानेवाले। पाहिजे तया दाखविले। आम्ही नाही झुकानेवाले ॥ ५ ॥ जें निसर्गनिर्मित सत्य। ह्या-पुढें फोल पांडित्य। फोडुनि घुसावें आंत ॥ ६ ॥

---

## पद १४ वें.

पुण्यनगरिच्या वैभवाला। डाग लागला आज पहाना वालि न आम्हां कोणी उरला ॥ धृ ॥ बाळटिळक तो येथें होता। सिंहगर्जना त्याची ऐकता। कांपतहोते रिपू तयाला। वैभवाला ॥ १ ॥ लाहोरी ज्यानें रोविला। झेंडा भगवा स्वराज्याचा। तोचि लोपतां अंध झाली। ही जनता ॥ २ ॥ नेता नाही कुणी आम्हाला। भांडण तंटे घडोघडीला। म्हणुनी हीन स्थिती पुण्याला। वैभवाला ॥ ३ ॥

---

## पद १५ वें.

आपल्या रायबाचं लग्न होऊंद्या । मधेंच काय काढलं । अहो तान्हबा येवढं पाहिजे आमचं म्हननं ऐकलं ॥ ध्रु ॥ कसलं रायबाचं लग्न अगूदर घेउनशानी बसलात । तकड कोंडाना वाट पाहतो घ्या समशेर हातात ॥१॥ चला मर्दानो फुंका फुंकार शिंग लढाईचं । आज रात्रिला घेइन कोंडाना घेतलं वान सतीचं ॥ २ ॥ तथं किल्लेदार उदयभानुर रजपुत बाटलेला । अरं लाविला त्यानं काळिमा रजपुत नावाला ॥ ३ ॥ कसलं रजपुत अपुल्या बायका देती मोगलाला । तुम्हीच सांगा कसं आवडले आई भवानीला ॥ ४ ॥ तिनंच केला हूकुम शिवाला घे घे कोंडाणा । कामगिरीवर पाठव आपुला बाळ मितर तान्हा ॥ ५ ॥ चहूं कडुनरं ह्या मोगलानी सळो पळो केलं । तुम्हा आम्हासी बायकावानी रंडकं बनविलं ॥६॥ तुमच्या बायका अयाग्रहिनी धरुनशानी नेती । दिवसा ढवळ्या बळजोरीनं विटंबना करिती ॥७॥ देवळं फोडिली पोथ्या जाळल्या गाया कापत्यात । रडता कशाला बायकावानी बांगड्या भरानात ॥ ८ ॥ अशा नोडग्यांची पोटासाठी चाकरी कारं करनार । आपुन कोन हो विसरुन गेलात थुःत् तुमच्यावर ॥९॥ समदं मावळं एक दिलानं पडू घरा बाहीर । शिवरायाला उदयभानुचं वहाल करूं शीर ॥ १ ॥ तोच मराठा भिणार नाहीं कृतांत काळाला । बोलारं बोला हरहर बोला चला कोंडाण्याला ॥ ११ ॥ कोंडाण्याचं लगीन

उरकुन थाटानं येऊ। शिवरायरायबाची केळवण देइल आनंदानं खाऊं ॥ १२ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २८३६

---

पद १६ वें.

शिवबोध ध्यानी आणा। विकावे कधीन मन कोणा ॥ ध्रु ॥ आत्मशुद्धिची खरी परीक्षा होते संकट काली लांमुल चालन करावयाला तयार मन त्या वेळीं ॥१॥ जोवर नाही कीड लागली मनरूपी वृक्षाला तोंवर आशा गोड फळांची म्हणुनी जपावे त्याला ॥ २ ॥ निसर्ग निर्मित स्वतंत्र मनहे बांधु शकेना कोणी जन्म सिद्ध मी स्वतंत्र आहे भिती कुणाचि ना मनी॥३॥ स्वराज्य-सन्निध जो जो होईल दडपशाहीची व्याप्ती साधुछलाविण कधी न होते स्वातंत्र्याची प्राप्ती ॥ ४ ॥ विनाश काले आधीं होतो बुद्धी भ्रंश ममुजाला। बुद्धि जाउनी भांडवल सरता कोणी विचारिना त्याला ॥ ५ ॥ आधी उन्हाळा सहन करावा थंडगार मग वृष्टी। भावी सुखास्तव दुःख भोगिता कधीं न व्हावे कष्टी ॥ ६ ॥ निसर्ग निर्मित मन हे आहे स्वतंत्र ज्याचे त्याला मन विकतीते इह परलोकीं मुकती स्वात्मसुखला ॥ ७ ॥ कोण कसा तो आधीं जाणुनी स्नेह करावा त्याशी ध्येय मांडण्या मन हे आपुले देउं नये कोणाशी ॥ ८ ॥ यशापयश तें ठावे काळा प्रयत्न मनुजा हातीं काळ बैसला मदांदतेची जीरवायाला मस्ती ॥ ९ ॥

समाप्त.

# आर. बी. परांजपे

७७२, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## यांच्या कारखान्यांत खालील प्रमाणें माल तयार होतो.

## पेपरमिंट

श्रीखंड, सुंठ, स्ट्राँग, केळें, अननस. गुलाब, आंबा, वगैरे सर्व प्रकारचें औषधी, सुवासिक व अर्कांचे पेपरमिंट.

मेंथॉलार्क, सॅन्टोनाईन, गुलकंद, मुरावळा, ( साधा आणि सूर्यपुटी, ) खोकल्याच्या गोळ्या व शौचशुद्धीच्या वड्या,. शुद्ध केलेलें एरंडेल तेल, औषधी अर्क, गुलाबपाणी, ओले हळद-कुंकू.

## बाळगोळी

तान्ह्या मुलांस गुटगुटीत करणारी.

आमचे बाळगोळींत मादक पदार्थ नाहीं, सबब लायसेन्सची जरूर नाहीं.

सर्व मालाचा क्याटलाग फुकट.

# विश्वरंजन सुगन्धालय, पुणें.

## येथें

शास्त्रोक्त पद्धतीनें सर्व प्रकारचीं सुवासीक तेलें तयार होतात. विद्यार्थी, व्यापारी, मानसिक श्रम करणारे वगैरे सर्व हींच तेलें वापरून **उष्णतेपासून होणारे सर्व विकार खास बरे होतात व मेंदूस थंडावा येऊन तो नेहमीं शांत राहतो** अशी हमी देतात.

आपण वापरून खात्री करा व इष्टमित्रांना वापरण्यास सांगा.

| | | | |
|---|---|---|---|
| कपाशी, आवळा, नागर, नारंगी | ३ औंस बाटलीस | | ८५ |
| ,, | ४ | ,, | ८६ |
| ब्राह्मी तेल | २ | ,, | ८६ |
| ,, | ४ | ,, | ८८ |

व्यापारी भाव मागवा प्रसिद्ध दुकानदारांकडे मिळतील अगर खालील पत्त्यावर लिहा.

---

विश्वरंजन सुपारी:—निवडक माल प्रमाणशीर मसाला घालून तयार केलेली रोजच्या खाण्यांत ठेवा व पाचक असल्यामुळें कशी काय चरचरीत भूक लागते याचा अनुभव घ्या. **शंभर पुड्यांस १। रु.**

---

प्रोप्रायटर—वसंत ब्रदर्स कसबा, पुणें.

# चहाचे दुकान.

## येथें उत्तम फराळाचें सामान मिळेल.

मालकः—केशव जनार्दन लवाटे.

३४८, सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# सुप्रसिद्ध स्पेशल टी

# कोठें मिळेल?

याच ठिकाणीं

आजकाल पुण्यांत आमच्याच चहाची प्रसिद्धी कां ?

विक्रीस तयार ! विक्रीस तयार ! !

सुप्रसिद्ध टी मिक्श्चर जे आम्ही वापरतो तेच

आम्ही आमच्या गिऱ्हाईकांकरितां

विक्रीस तयार ठेविलें आहे.

मिळण्याचें ठिकाण—

पुणें, पेठ सदाशिव, घ. नं. ६०९

मालकः——गोविंद रामचंद्र जकाते.

तीन चार साईजची व भरपूर माहितीची

# श्रीहनुमान प्रेसची डायरी

## सन १९२६.

लौकरच विक्रीस तयार होईल मागणी करून ठेवा. व्यापाऱ्यास भरपूर कमिशन

पत्ता:—हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणे शहर.

# गोखले यांचे विश्रांति गृह.

येथें

चहा कॉफी व फराळाचे सर्व सामान

स्वच्छ व काळजी पूर्वक मिळेल.

मा. गणेश अनंत गोखले.

पत्ता—सदाशिव पेठ, घर नंबर ८८३, तुळशीबागेची पिछाडी,

भागवत यांचा वाडा.

वर्गणीदार व्हा. वर्गणीदार व्हा.

# रसवन्ती

( कवितेचें मासिक )

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञाम् ।
जानंति ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ।।

संपादक

गोपाळ गोविंद अधिकारी

वार्षिक वर्गणी रु. १।०९ ट. ख. नि.

पत्ता:—

सारस्वत प्रसारक मंडळी, पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नं. ........
ता. ........
ठाणे.

# जागरणाचा त्रास.

गणपती उत्सवांत जागरणानें सर्दी, पडसें, खोकला, डोकें जड होणें वगैरे होण्याचा फार संभव असतो, म्हणून अगोदरच

# " कामण्णा तपकीर "

एक बाटली घेऊन ठेवा. या नांवाजलेल्या तपकीरीच्या! नित्य उपयोगानें वरील सर्व विकार नाहींसे होऊन प्रकृति साफ रहाते व अंगांत एक तऱ्हेची हुशारी उत्पन्न होते. खास सवलत म्हणून फक्त उत्सवापुरतीं किंमत अगदींच कमीं म्हणजे

# अडीच आणे

ठेविली आहे. सर्व दुकानीं मिळते.

REFBK-0002836
REFBK-0002836

सोल एजंटः--

## सार फार्मसी,

सदाशिव पेठ, पुष्करणी हौदाजवळ.

प्रकाशकः-महादेव दत्तो देसाई, सदाशिव पेठ, घर नंबर ३५८, पुणें.